## गुरू पूणिमा

**इस अखिल विश्व तथा समस्त जीवों एवं वस्तू-पदार्थोंके मूल स्त्रोत, गुरूओंके परम गुरू, परमात्मा आपके हृदय-मंदिर में नित्य विराजमान हैं। वे आपके अत्याधिक समीप हैं। वे अपनी बाँहें फैलाए, अत्यंत प्रेमपूर्वक आपको स्वीकार करने हेतु तत्पर बैठे हैं। उनकी शरण में जाये, केवल उन पर ही निर्भर रहें। स्पष्ट बोधपूर्वक अपने इन अन्तर्वासी शाश्वत परमात्म-तत्व से तादात्म्य करें। केवल तभी आपको शाश्वत शान्ति, असीम आनंद, परम तृप्ति एवं अमृतत्व की प्राप्ती होगी।**

**-स्वामी शिवानंद**

Concentration is as natural to a refined and purified mind as fluctuation and imagination are to an impure and gross mind.

-Swami Chidananda

Only one desire should fill your entire being, the desire to achieve the SUPREME, the desire (blessed desire) to know the Eternal. Welcome this Desire and treasure it in the secret treasure-chamber – your heart.

-Swami Chidananda



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत-

- ✻ जून २०२४ चा सत्संग ३० तारखेला झाला.
- ✻ 'दिव्य जीवन' या आपल्या मासिक पत्रिकेचा जून महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना पाठविण्यात आला.
- ✻ देणगी-
  - अ) सौ. सीमा माईणकर, सांगली रू.२000/-
  - ब) सौ.मानसी घमंडे, पुणे रू.९३0/-

### पुणे शाखेचा पत्ता


श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११0६८,
मो.नं. ९८५0९३१४१७

बुक पोस्ट


प्रति,



# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १९ / अंक 0७
जुलै २0२४



Man's future is absolutely in his own hands, and entirely depends upon hiswill, right thinking and right exertion.

**Swami Sivananda**

The slumber of Avidya is spiritual death. We are more dead than living if we go through each day in a state of this inner slumber.

**Swami Chidananda**

## महिन्याचा विचार :

सिद्धी

भगवंत प्राप्ती शिवाय या जगात अधिक श्रेष्ठ काय असू शकेल? भक्ती योगाचे हे अत्त्युच्च फळ आहे. नजरेसमोर प्रत्यक्ष भगवंत दिसणे यापरते दुसरे सत्य असू शकत नाही. गुरूदेवांनी कधीही भगवंत प्राप्तीचा ढोल पिटला नाही की देवदर्शनाबद्दल कोणालाही ते सांगत सुटले नाही. ''प्रत्येकाचा परिचय त्याच्या कर्माने होत असतो.'' हे तत्वज्ञान ते आयुष्यभर जगले. हस्तरेखाकर आणि भविष्यवेत्त्यांनी हे मान्य केलं आहे की गुरूदेवांना किमान तीन वेळा भगवंताचे दर्शन झाले होते. तेही – मलाया येथे प्रयाण करण्यापूर्वी आणि संन्यासदीक्षा घेण्यापूर्वी. त्यांना निर्विकल्प समाधी अवस्था आधीच प्राप्त झालेली होती.

आपणासाठी मात्र त्यांचे कार्य अधिक महत्वाचे होते. मानवतेला त्यांनी परमोच्च देणगी दिलेली आहे. काही मंडळींना भ्रम असेल किंवा आपण भगवंताला बघितले आहे असे रस्त्यावर काही मंडळ सांगत फिरत असतीलही. क्वचित ज्यांना थोडी मानसशास्त्राची पार्श्वभूमी असेल असे काहीजण एखाद्या लाभाच्या आशेने ईश्वराची, त्याच्या कृपेची देवाणघेवाणही करीत असतील अशा सर्वांकडून मानवता फक्त फसविली जाते. गुरूदेव मात्र मानवतेचे तारणहार होते. त्यांच्या उपस्थितीत आपल्याला अत्त्युच्च आनंद, मन:शांती आणि कृतार्थतेचा प्रसाद मिळत असे. त्यांच्या नजरेतून, कटाक्षातून उत्थान झाल्याचे, परिवर्तन झाल्याचे, शुद्धीकरण झाल्याचे भाव मनात उमटत असत. देवत्व त्यांच्याभोवती दरवळत असल्याचा अनुभव येत असे. ज्यांच्यावर गुरूदेवांच्या कृपादृष्टीचा प्रकाश पडत असे. त्यांच्याभोवतीचा निरीश्वरवादाचा अंधकार, सांसारिकता आणि अशुभ तत्वे अदृश्य होत असत.

आश्रमात गुरूदेवांनी प्रार्थना केली की अविश्वसनीय उपचार होत असत. ज्यांची गुरूदेवांवर श्रद्धा होती, ती साधक मंडळी नि:संकोचपणे त्यांच्या समोर मन मोकळे करीत असत. आणि श्रद्धेने त्यांचे पूजन करीत असत. ''मिरॅकल्स ऑफ शिवानंदा'' या पुस्तकात साधकांचे अनेक आश्चर्यजनक अनुभव संग्रहित करण्यात आलेले आहेत.

मंत्रशास्त्राशी परिचय असलेल्यांना हेही माहित असते की दीक्षाविधी तेव्हाच संपन्न होतो, जेव्हा दीक्षा देणारी व्यक्ती स्वत:च सिद्धीप्राप्त असते आणि ती सर्वच दृष्टीने परिपूर्ण असते. साधकाने निवडलेल्या /सुचविलेल्या देवतेची गुरूदेवांनी त्याला त्यानुसार तात्काळ दीक्षा दिलेली आहे. अशी अगणित उदाहरणे आहेत की,ज्यावेळी साधकाला दीक्षाप्राप्ती ही आयुष्य बदलून टाकणारी घटना आहे, मन:शांती आणि अव्यक्त परमानंद याचा अनुभव यायला सुरूवात झालीय अशी अनुभूती आली. साहजिकच गुरूदेवांनी ईश्वरतत्वाशी एकजीव होऊन सर्व मंत्रांचे सार आत्मसात केलेले असल्याने त्यांना मंत्रसिद्धी प्राप्त झालेली आहे, हे सत्य जाणवते. त्यांच्यामार्फत दैवी शक्ती आणि अनुग्रह यांचे प्रवाह संक्रमित होऊन आपल्यापर्यंत येतात. अनुग्रह देताना गुरूदेव जेव्हा इष्ट मंत्राचे पठण करतात आणि साधकाला त्यांच्या पाठोपाठ पुनरूच्चार करायला सांगतात. तेव्हा तात्काळ तो मंत्र गुरूदेवांच्या अध्यात्मिक शक्तीशी एकरूप होऊन साधकाच्या ह्रदयातील अंतर्मनाशी ज्वालेप्रमाणे स्थिर होतो. ज्यांना गुरूदेवांनी दीक्षा दिलेली आहे, त्यांना ही मंत्रसिद्धी प्राप्त झालेली आहे.(क्रमश:)

- Sivananda's Integral Yoga
by Swami Venkatesanandа

**निमंत्रण**

दिव्य जीवन संघ, पुणे शाखा आयोजित

स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यान

विषय – ''यज्ञीय पात्रे''

**प्रदर्शन आणि सादरीकरण**

***श्रीमती श्रद्धा परांजपे, पुणे***

दिनांक –जुलै १४, २०२४ (रविवार)

वेळ – सायंकाळी पाच वाजता

स्थळ – वेद शास्त्रोत्तेजक सभागृह, सणस मैदानासमोर, पुणे (०२०–४३३१६२२)